लोकमत पु. पान क्र. १

## रिव्हॉल्व्हरसह काडतुसे जप्त

नालासोपारा : भौजे राजीवली येथील सुदामानगर येथे अशिषकुमार मिश्रा हा एक पिस्तूल व १३ काडतुसे पोलिसांना कल्पना न देता जवळ बाळगलेला आढळला. याप्रकरणी पोलिस अंमलदार दत्तू चव्हाण यांनी अशिषकुमार याची तपासणी करून चौकशीअंती वरिष्ठांच्या आदेशाने तक्रार देऊन सोमवारी गुन्हा दाखल केला आहे. आशिषकुमार मिश्रा याने उत्तर प्रदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडील अधिकृत अग्निशस्त्र परवाना व नियम याचे उल्लंघन केले. परवाना असलेले पिस्तूल, १३ काडतुसे जवळ बाळगून तो पालघर जिल्ह्यात वास्तव्यास होता. मात्र, शस्त्रास्त्रे जवळ बाळगल्याबद्दल त्याने येथील पोलिसांना कळवणे गरजेचे होते. मात्र, ते कळवले नव्हते.

## तरुणाची आत्महत्या



नालासोपारा : आचोळे डोंगरी येथे राहणारे प्रदीप चंदेलिया (३९) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी सोमवारी घरातील छताच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आचोळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## लाखोंचे मेफेड्रोन पकडले

नालासोपारा : शहराच्या पूर्वेकडील ओव्हर ब्रीजच्या खाली रविवारी रात्री तुळींज पोलिसांनी लाखो रुपये किमतीचा मेफेड्रोन पकडला आहे. आरोपी नायजेरियन नागरिक चुक्स आगे (४५) याने स्वतःच्या ताब्यात ३ लाख ५१ हजार ६०० रुपये किमतीचे ३५.१६० ग्रॅम मेफेड्रोन अमली पदार्थ ठेवले होते. तो ते विक्रीसाठी घेऊन आला असता पोलिसांना सापडला. नालासोपारा पूर्वेकडील ओव्हर ब्रीजखाली तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी पकडले आहे. तुळींज पोलिसांनी आरोपीला अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

## हुक्का पार्लरवर कारवाई

नालासोपारा : आचोळे पोलिसांनी मराठा दरबार हॉटेल याठिकाणी सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर रविवारी रात्री कारवाई केली आहे. मॅनेजर शोएब शेख (२१), सुमनकुमार महतो (२०) आणि मनीष सिंग (२५) या तिघांनी बेकायदेशीरपणे हुक्का पार्लर चालू करून ग्राहकांना हुक्का पिण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. पोलिसांनी ४ हुक्का पॉट, वेगवेगळ्या कंपनीचे फ्लेवर, असा एकूण ४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आचोळे पोलिसांनी सोमवारी गुन्हा दाखल केला आहे. याठिकाणी शुक्रवारीही आचोळे पोलिसांनी कारवाई करून गुन्हा दाखल केला होता.

लोकमत पु. पान क्र. 2

## साखरपुड्यानंतर अत्याचार करून लग्नाला नकार

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरारोड भागात राहणाऱ्या ३३ वर्षीय तरुणीसोबत साखरपुडा करून लग्नाची तारीख ठरवत बलात्कार करून नंतर तिला लग्नास नकार देणाऱ्या तरुणाविरुद्ध काशिमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा रोड भागात राहणाऱ्या ३३ वर्षीय तरुणीचे २०१७ पासून २९ वर्षीय तरुणाशी ओळखीतून प्रेमसंबंध जुळले. जुलै २०२३ मध्ये दोघांचा साखरपुडा झाला व २२ जानेवारी २०२४ ही विवाहाची तारीखसुद्धा ठरली.




संबंधित तरुणाने तरुणीच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने शारीरिक अत्याचार केले आणि नंतर लग्नास नकार दिला. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीनंतर उत्तन सागरी पोलिस ठाण्यात १ एप्रिल रोजी आरोपी तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याची घटना काशिमीरा पोलिस ठाणे हद्दीत घडलेली असल्याने उत्तन पोलिसांनी गुन्हा काशिमीरा पोलिस ठाण्यात वर्ग केला आहे.

## अत्याचार करून फोटो व्हायरल; तरुणावर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेला राहणाऱ्या एका २३ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करण्यासह तिचे फोटो व्हॉट्सॲपद्वारे व्हायरल करणाऱ्या तरुणावर नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरुणीला त्या तरुणाने लग्न करण्याचे आमिष दाखवले होते. लग्नाचे आमिष दाखवून त्याने तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक अत्याचार केले व नंतर लग्नास नकार दिला. तरुणीने लग्न करण्याबाबत जाब विचारल्याने त्याने तिचे काढलेले फोटो व्हॉट्सॲपद्वारे तरुणीच्या नातेवाइकांमध्ये व्हायरल केले. तरुणीच्या फिर्यादीवरून १ एप्रिल रोजी नवघर पोलिसांनी आरोपी तरुणावर गुन्हा दाखल केला असून पोलिस निरीक्षक अशोक कांबळे यांच्याकडे तपास सोपवला आहे.

CS CamScanner

लोकमत पू. पान क्र. १

आगरी कोळी सेना करणार आंदोलन

# अनधिकृत माती भराव सुरूच; यंदाही महामार्ग जलमय होण्याची भीती

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर भूमाफियांकडून माती भराव मोठ्या प्रमाणात सुरूच असल्यामुळे यंदाही महामार्ग जलमय होण्याची भीती व्यक्त होत आहे.

याप्रकरणी वसई तहसीलदार कार्यालयासमोर आगरी-कोळी सेनेने २ मार्च रोजी लाक्षणिक आंदोलन केले होते; मात्र त्यानंतरही महामार्गावर ससूनवघर ते बापाणेदरम्यान नैसर्गिक नाले तसेच उघाड्या बुजवून माती भराव करण्याचे काम सुरूच आहे. याबाबत आगरी-कोळी सेना प्रसारमाध्यमांसह ५ एप्रिल रोजी माती भरावाची पाहणी करणार आहे. महसूल विभागाने दिलेले आश्वासन पूर्ण न केल्याने आगरी कोळी सेनेने हे पाऊल उचलले आहे.



मुंबई-अहमदाबाद महामार्ग परिसरात ससूनवघर ते बापाणेदरम्यान नैसर्गिक नाले तसेच उघाड्या बुजवून माती भराव करण्याचे काम सुरूच आहे.

## पावसाळ्यात महामार्गावर आठवडाभर साचले होते पाणी

१ मोठ्या प्रमाणावरील माती भरावामुळे गेल्यावर्षी महामार्गावर आठवडाभर पाणी साचून वाहतूक व्यवस्था कोलमडली होती. याबाबत वसई महसूल विभाग व पालिका अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी खरडपट्टी काढल्यानंतर या दोन्ही प्रशासनांनी महामार्गावर धडक कारवाईस सुरुवात केली होती. अनेक अनधिकृत बांधकामे तोडली गेली, माती भराव उपसला गेला; मात्र पालिकेच्या कारवाईची पाठ वळताच पुन्हा एकदा अनधिकृत बांधकामे आणि माती भरावास सुरुवात झाली आहे.

२ ससूनवघर ते बापाणे दरम्यान नैसर्गिक नाले तसेच उघाड्या बुजवून माती भराव करण्याचे काम सुरू आहे. बेसुमार माती भरावामुळे नैसर्गिकरीत्या पाण्याचा निचरा होणाऱ्या उघड्या, स्रोत पूर्णपणे बुजवले गेले आहेत तर काही ठिकाणी त्याचा मार्ग वळवण्यात आला आहे. खाडीकडे पाणी वाहून नेणारे सर्व मार्ग बंद झाल्यामुळे गेल्यावर्षी पाणी महामार्गावर साचून महामार्ग पाण्याखाली गेला होता. सुमारे आठ-दहा दिवस महामार्ग बंद होता. त्यावेळेस पोलिस प्रशासन, महसूल प्रशासन हे खडबडून जागे झाले.

३ जेथे पाणी जाण्याचे मार्ग बंद करण्यात आले होते. ते तात्पुरते मोकळे करण्यात आले; परंतु त्यानंतरदेखील पुन्हा येथे मोठ्या प्रमाणात माती भराव होऊन अनेक नैसर्गिकरीत्या पाणी वाहून जाणारे स्तोत्र माती टाकून बंद करण्यात आले आहेत. याबाबत आंदोलन करूनही लक्ष न देणाऱ्या महसूल विभागाला जाग आणण्यासाठी आगरी कोळी सेनेचे भूपेश कडुलकर हे प्रसारमाध्यमांना सोबत घेऊन महामार्गावर माती भरावासंदर्भात पाहणी करून पोलखोल करणार आहेत.

CamScanner

लोकमत पु. पान क्र. 4

# अॅल्युमिनियमच्या प्लेट चोरीला

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारच्या रुस्तमजी कन्स्ट्रक्शन साइटवरील ३५ अॅल्युमिनियम प्लेट चोरीला गेल्या आहेत.

१ एप्रिलच्या पूर्वी साइटच्या २०० मीटर अंतरावर असलेल्या पत्र्याच्या गोडाऊनचा पाठीमागील पत्रा उचकटून त्याद्वारे प्रथमेश पाटील (३०) आणि संतोष धोडी (३६) या दोघांनी ७० हजारांच्या ३५ अॅल्युमिनियम प्लेट घरफोडी करत चोरी करून नेल्या आहेत. सुपरवायझर राजेशकुमार सिंग (४४) यांनी सोमवारी अर्नाळा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# हेवी डिपॉझिटच्या नावावर लाखोंची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : एव्हरशाईन लास्ट स्टॉप येथील रश्मी गार्डन येथे राहणारे अजय पाठक (३२) यांची हेवी डिपॉझिटवर रूम देण्याच्या नावाखाली २८ फेब्रुवारी ते आजपर्यंत लाखोंची फसवणूक झाली आहे.

संतोष चव्हाण, सूर्या तिवारी, शुभम उर्फ बाबा मिश्रा, शिवा शुक्ला, सौरभ आणि गोपिकांत शर्मा या सहा आरोपींनी वाल्मीकी हाईट्स या इमारतीतील अंकिता नरवणकर यांच्या मालकीच्या सदनिकेची बनावट कागदपत्रे बनवली. नंतर हा रूम हेवी डिपॉझिटद्वारे रजिस्टर भाडे करारनामा करून अजय यांच्याकडून ४ लाख रुपये घेतले. मात्र रूम त्यांना न देता त्यांचे पैसे स्वतःच्या फायद्याकरिता वापरून फसवणूक केली आहे. आचोळे पोलिसांनी सोमवारी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पान क्र. 3

# पाणी भरण्यावरून राडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरारोड : बोअरिंगचे पाणी भरण्यावरून दोन कुटुंबांमध्ये राडा झाला. ही घटना घोडबंदर मार्गावरील काजूपाडा भागात घडली. दोन्ही कुटुंबीयांनी एकमेकांविरोधात केलेल्या तक्रारीनुसार काशीगाव पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

पाणी भरण्यावरून गुंजा, संजय यादव, गिरिजा मिश्रा यांच्यात भांडण झाले. या प्रकरणी गुंजा संजय यादव (२७) हिच्या फिर्यादीनुसार, गिरिजा मिश्रा, अजय मिश्रा, गोलू मिश्रा, अमन मिश्रा, खुशबू मिश्रा, वनिता मिश्रा यांनी जमाव जमवून गुंजा व त्यांचे पती संजय यांना मारहाण केली. तसेच गिरिजा याने विनयभंग केला. त्यानुसार ६ जणांवर गुन्हा दाखल केला, तर वनिता गिरिजा मिश्रा (४०) हिच्या तक्रारीनुसार, संजय यादव, गुंजा यादवसह दोघांनी वनिताचा भाऊ अजय दुबे याची कॉलर पकडली, तर संजयने वनिताला मारहाण करून केस पकडून खाली पाडून विनयभंग केला. या प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल केला असून, सपोउपनि शेख तपास करत आहेत.

CamScanner

पुढारी पृ. पान क्र. १

## मंगळसूत्र चोरीला

**पालघर :** पालघर जिल्ह्यात चेन स्नॅचिंगच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. मनवेल पाडा येथील रहिवाशी वनिता कदम या महिलेचे मंगळसूत्र चोरीला गेल्याची घटना घडली आहे. नालासोपारा रत्नागिरी एसटी बसने प्रवास करत असताना त्यांच्या बॅगमधील एक लाख साठ हजाराच्या जवळपासच्या किमतीचे मंगळसूत्र अज्ञाताने पळवून नेले. नालासोपारा पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला असून तपासकामी हा गुन्हा खेड पोलीस ठाण्याकडे वर्ग केला आहे.या प्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहे.

## नैराश्येतून आत्महत्या

**पालघर :** विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मनवेल पाडामधील शीतल अंजली इमारतीतील रीना सिंग (४५) यांनी नैराश्येतून आत्महत्या केल्याचा प्रकार घडला आहे. पंख्याला ओढणीने गळफास घेत त्यांनी ही आत्महत्या केली. या घटनेची विरार पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली आहे. या प्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहे.

पुढारी पृ. पान क्र. 4

## अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पालघर :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर नायगाव हद्द रॉयल हॉटेल जवळ एका दुचाकीला पाठीमागून कारने जोरदार धडक दिल्यामुळे दुचाकी स्वाराचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. नयानगर येथील जुबेर सोलंकी असे दुचाकीस्वाराचे नाव असून ते महामार्गाने मिरा रोडकडे जात असताना हा अपघात घडला. कारचालकाविरोधात नायगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## इसमाची नशेत आत्महत्या

**पालघर :** वसई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४२ वर्षीय सुभाष जाधव या व्यक्तीने नशेमध्ये आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. पंख्याला गळफास घेऊन त्यांनी रविवारी ही आत्महत्या केल्यानंतर वसई पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे .

## दुकानातून साड्यांची चोरी

**पालघर :** तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रगती नगरस्थित असलेल्या लक्ष्मी साडी दुकानातून साड्या चोरीला गेल्याचा प्रकार समोर आला आहे. एक पुरुष व तीन महिलांनी दुकानात येऊन ४३ हजार रुपयाची किंमत असलेल्या या साड्या सोडून दिल्यानंतर दुकान मालकाने दिलेल्या तक्रारीनुसार तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

पुढारी पान क्र. 8

# गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना मिरा रोडमध्ये अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत ४ किलो गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडे असलेल्या बॅगची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यात ४ किलो वजनाचा ८० हजार रूपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ व दोन मोबाईल असा एकुण १ लाख ५ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला असून तो जप्त करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री करणारे तसेच बाळगणारे व्यक्तींचा शोध घेवुन त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याबाबत वरीष्ठांनी वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, सहा. पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग करत असताना मुंबई अहमदाबाद महामार्गावरील मन ओपस बिल्डिंग जवळील पडक्या घराजवळ काशिमिरा येथे पारस धिरूभाई चावडा (३०) रा. स्वप्न व्हिला, सत्यमनगर, कामरेज, जिल्हा सुरत गुजरात , पुष्पक महेंद्रसिंग



चौहान (२८ ) रा. भगवती अव्हेन्यु, सत्यमनगर, ननसाडरोड, कामरेज, जिल्हा सुरत, गुजरात हे इसम संशयास्पद रित्या वावरत असताना दिसून आले. त्यांच्याकडे असलेल्या बॅगची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यात ४ किलो वजनाचा ८०,००० रू किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ व दोन मोबाईल असा एकुण १,०५,००० रू किंमतीचा मुद्देमाल मिळून आला असून तो जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरोधात काशिमिरा पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस ऍक्ट च्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल करुन त्यांना गुन्हयात अटक करण्यात आली आहे. या गुन्हयाचा तपास पोउपनिरी शिवाजी खाडे हे करत आहेत.

म.टा.पू. पान क्र. 1

# विजयवल्लभ दुर्घटनेप्रकरणी एसआयटी चौकशी करा!

**म. टा. वृत्तसेवा, वसई**



विरार येथील विजयवल्लभ रुग्णालयाला आग लागून १५ रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना तीन वर्षांपूर्वी घडली होती. या दुर्दैवी मृत्यूप्रकरणी तत्कालीन पालघर जिल्हाधिकारी यांनी सखोल चौकशी करून सरकारला सादर केलेला अहवालात विविध बाबी समोर आल्या आहेत. तसेच या अहवालात तत्कालिन पालिका अधिकाऱ्यांवरदेखील ताशेरे ओढले असून अहवालात नमूद तत्कालीन वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची विशेष तपास यंत्रणेमार्फत (एसआयटी) चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

विजयवल्लभ रुग्णालय दुर्घटना घडल्यानंतर चौकशी करण्यासाठी पालघर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आली होती. दुर्घटना घडल्यानंतर १ महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांनी या दुर्घटनेसंदर्भात आपला चौकशी अहवाल राज्य सरकारला सादर केला होता. हा अहवाल प्रहार जनशक्ती पक्षातर्फे मागविण्यात आला होता. यामध्ये तत्कालीन अधिकाऱ्यांबाबत अनेक गंभीर बाबी नमूद केल्या आहेत. चौकशी अहवाल सादर करून ३ वर्षे उलटली आहेत. मात्र या चौकशी अहवालावर सरकारने आजवर कारवाई का केली नाही? असा प्रश्न प्रहार जनशक्तीचे हितेश जाधव यांनी विचारला आहे.

### चौकशी अहवालात नमूद बाबी

- रुग्णालयाच्या ज्या अतिदक्षता विभागात आग लागली तेथील वातानुकूलित यंत्राची क्षमता १३-१५ टन असणे आवश्यक होते. परंतु अतिदक्षता विभागामध्ये ९ टन क्षमतेची यंत्रणा बसविली होती.
- विद्युत निरीक्षक यांची परवानगी घेणे बंधनकारक होते. परंतु सदर रुग्णालयात वरील दोन्ही बाबींची पूर्तता करण्यात आली नव्हती.
- घटना घडल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित विभागांना गोपनीय अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासनाने जो अहवाल पाठवला त्यावर आयुक्तांची स्वाक्षरी नव्हती.
- घटना घडल्यानंतर अतिरिक्त आयुक्त आशिष पाटील आणि अतिरिक्त आयुक्त संतोष देहरेकर तसेच उपायुक्त किशोर गवस, उपायुक्त शंकर खंदारे आणि उपायुक्त अजिंक्य बगाडे यांनी घटनेची कल्पना जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर यांना देणे आवश्यक होते. परंतु, कुणीही घटनेची कल्पना जिल्हाधिकाऱ्यांना दिली नाही.

CS CamScanner

म.टा.पु. पान क्र.1

# डम्पिंगचे स्थलांतर करा, अन्यथा वाहने रोखू

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

## उत्तनवासीयांचा मनपाला इशारा

डम्पिंगमुळे उत्तनवासी आधीच अनेक समस्यांनी त्रस्त झाले असून, साठलेल्या कचऱ्याला वारंवार लागणाऱ्या आगीच्या घटनांमुळे त्यात आणखी भर पडली आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या एका शिष्टमंडळाने मंगळवारी पालिका आयुक्तांची भेट घेत, डम्पिंगचे स्थलांतर करण्याच्या प्रमुख मागणीसह विविध उपाययोजनांच्या मागण्यांचे निवेदन दिले. त्या पूर्ण न केल्यास प्रकल्पात जाणाऱ्या गाड्या रोखू, असा इशारा देण्यात आला.

मिरा-भाईंदर पालिका हद्दीत दररोज तयार होणारा कचरा प्रक्रिया करण्यासाठी उत्तन येथील धावगी डोंगरावर उभारण्यात आलेल्या कचरा प्रकल्पामध्ये टाकला जात आहे. येथे दररोज गोळा होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जात असली, तरी गेल्या काही वर्षांपासून लाखो क्युबिक मीटर कचरा प्रक्रियेअभावी साठून राहिला आहे. या कचऱ्याच्या दुर्गंधीचा त्रास अनेक वर्षांपासून स्थानिकांना सहन करावा लागत असून, त्यामुळे अनेक आजार उद्भवू लागले आहेत.

यासह कचऱ्याचे दूषित पाणी, शेतात, विहिरीत आणि समुद्रात जात आहे. परिणामी येथील जमीनदेखील नापीक झाली असून, स्थानिक रहिवाशांना मोठ्या प्रमाणावर दरवर्षी नुकसान सहन करावे लागते, असे नागरिकांचे म्हणणे आहे. या समस्यांत मागच्या काही दिवसात डम्पिंगमध्ये साठलेल्या कचऱ्याला वारंवार लागणाऱ्या आगीमुळे भर पडली आहे. आगीमुळे हवेत पसरणाऱ्या घातक धुराचा त्रासही नागरिकांना सहन करावा लागत आहे.



### निवडणुकांवर बहिष्कार

डम्पिंग प्रश्नावर उत्तन ग्रामस्थांची एक बैठक नुकतीच पार पडली. डम्पिंगचा प्रश्न सुटत नाही, तोवर आगामी काळात पार पडणाऱ्या सर्वच निवडणुकांवर बहिष्कार निर्णय घेण्यात आला. तर मंगळवारी आयुक्तांच्या भेटीदरम्यान ग्रामस्थांचा एक गट मात्र आंदोलन करण्याच्या विरोधात असल्याचे पाहायला मिळाले.

यासंदर्भात ग्रामस्थांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. मनपाकडून डम्पिंग बंद करण्याच्या दृष्टीने अनेक आश्वासने देण्यात आली आहेत. मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप केला जात आहे. मंगळवारी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने पालिका आयुक्त संजय काटकर यांची भेट घेत, डम्पिंग इतर ठिकाणी स्थलांतरित करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही हाती घ्यावी या मुख्य मागणीसह काही उपाययोजना करण्यासंदर्भातील मागण्या करण्यात आल्या.

### ग्रामस्थांच्या मागण्या

- उत्तन पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यांत प्रदूषण पसरविणे आणि जीवितास धोका निर्माण कलमांची वाढ करावी.
- आगीच्या घटनांच्या चौकशीकरीता समिती नेमावी.
- प्रकल्पात क्षमतेपेक्षा अधिक कचरा टाकण्यात येऊ नये
- जमीन नापीक झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यात यावी.
- प्रकल्पात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत.
- प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण यंत्र बसविण्यात यावे.

सकाळ पान क्र.5

# कॅसेटवाला हत्या प्रकरणातील आरोपीला ३६ वर्षांनी अटक

बोळींज, ता. २ (बातमीदार) : वसईत १९८८ साली झालेल्या सलीम कमाल उर्फ कॅसेटवाला हत्या प्रकरणातील फरारी आरोपी क्लेमेन लोबो उर्फ मुन्ना याला तब्बल ३६ वर्षांनी अटक करण्यात आली आहे. हत्येनंतर तो परदेशात फरार झाला होता. ९० च्या दशकातील सलीम कॅसेटवाला हत्या प्रकरण सर्वात गाजलेले प्रकरण मानले जाते.

सलीम कमाल उर्फ कॅसेटवाला हा बहुजन विकास आघाडीचे ज्येष्ठ कार्यकर्ते सिराज कमाल यांचा भाऊ होता. त्याचे कॅसेटचे दुकान होते. १९८८ साली सलीम वसई पश्चिमेकडील माणिकपूर रस्त्यावर (आताच्या दत्तात्रय शॉपिंग सेंटरसमोर) संध्याकाळी साडेसातच्या सुमारास आपल्या मुलासह पाणीपुरी खात असताना ७ जणांच्या टोळीने भररस्त्यात त्याची हत्या केली होती.

पूर्ववैमन्यसातून ही हत्या करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. तेव्हा वसईत फक्त वसई हेच पोलिस ठाणे होते. तत्कालीन वसई पोलिसांनी ६ जणांना अटक केली होती. मात्र, सातवा मुख्य आरोपी क्लेमन लोबो उर्फ मुन्ना (आता वय ५५) हा फरार झाला होता. नंतर त्याचा काहीच ठावठिकाणा लागला नाही. कालांतराने हे प्रकरण थंड झाले होते. माणिकपूर पोलिसांनी या प्रकरणाचा नव्याने तपास सुरू केला होता. फरार आरोपी क्लेमेन लोबो हा परदेशातून वसईत आल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याला अटक केली.

# अल्पवयीन मुलाला बेदम मारहाण

बोळिंज, ता. २ (बातमीदार) : कुत्र्याला मारहाण केल्याबद्दल जाब विचारला म्हणून अल्पवयीन मुलाला जमावाने मारहाण केल्याची घटना विरार पूर्वेला चंदनसार परिसरात सोमवारी (ता. १) घडली. कौस्तुभ जाधव (वय १७) असे मुलाचे नाव असून त्याला मोठी दुखापत झाली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंदनसार परिसरातील पेट्रोल पम्पावरील कर्मचारी एका कुत्र्याला गोणीत भरून मारहाण करत होते. त्या वेळी कौस्तुभ जाधव याने त्यांना याचा जाब विचारला. तसेच मारहाण करण्यास मज्जाव केला. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या जमावाने कौस्तुभला मारहाण केली. तसेच लोखंडी रॉडनेही त्याच्यावर हल्ला केला. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला.

# तीन महिन्यांत ३३ लाखांचे अमली पदार्थ जप्त

भाईंदर, ता. २ (बातमीदार) : मिरा-भाईंदर शहरातील विविध भागात अमली पदार्थांचे सेवन तसेच विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांकडून धडक कारवाई करण्यात आली आहे. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांच्या कालावधीत या प्रकरणी २२५ गुन्हे दाखल झाले असून २४१ आरोपींवर कारवाई झाली आहे. आरोपींकडून ३३ लाख ४७ हजार १०० रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

या वर्षी जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत सात पोलिस ठाण्यांमध्ये एकूण २२५ गुन्हे दाखल करण्यात आले. यात २४१ आरोपींवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एकूण ३३,४७,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र. ५

# तक्रारदाराला ऑनलाइन फसवणुकीतील सव्वा तीन लाख रुपये परत

## काशिमिरा पोलिसांची जलद कारवाई

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** सायबर भामट्यांनी लंपास केलेली सव्वा तीन लाखांची पूर्ण रक्कम काशिमिरा पोलिसांनी तक्रारदाराला परत मिळवून दिली आहे. तक्रार प्राप्त होताच काशिमिरा पोलिसांनी तत्काळ कारवाई करून खाती गोठवली आणि सायबर भामट्यांना त्यावर डल्ला मारता आला नाही.

मिरा रोड येथे राहणारे तक्रारदार दर्शन व्यास यांना आर्थिक अडचण होती. त्यासाठी त्यांनी कर्ज घेण्यासाठी गूगलवरून 'क्रेडिट इन्स्टॉलमेंट लोन' नावाचे ॲप डाऊनलोड केले होते. मात्र हे लोन ॲप बनावट होते. दर्शन व्यास यांनी या लोन ॲपच्या सायबर भामट्याने कर्ज घेण्यासाठी विविध शुल्कापोटी वेगवेगळी कारणे सांगून ३ लाख २९ हजार रुपये भरण्यास सांगितले होते. ही रक्कम वेगवेगळ्या खात्यात जमा झाली होती. मात्र एवढे करूनही व्यास यांना कर्ज मिळाले नाही तसेच त्यांनी शुल्कापोटी भरलेली सव्वातीन लाखांची रक्कमही मिळाली नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच व्यास यांनी काशिमिरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी या फसवणुकीप्रकरणी गुन्हा दाखल केला होता.

तक्रारदार व्यास यांनी भरलेली रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात जमा करण्यात आली होती. मात्र वेळीच तक्रार आल्यानंतर काशिमिरा पोलिसांनी तात्काळ संबंधित बँकेशी संपर्क साधून रक्कम गोठवली होती. नंतर पोलिसांनी न्यायालयात पत्रव्यवहार करून फसवणूकीची रक्कम तक्रारदाराला परत मिळवून दिली. काशिमिरा पोलिसांनी तत्काळ कारवाई केल्याने सायबर भामट्यांना रक्कम काढून घेण्यापूर्वीच गोठविण्यात आली. सायबर गुन्ह्यात फसवणूक झालेली रक्कम शंभर टक्के परत मिळवून देण्याची ही दुर्मीळ घटना आहे.

### काय काळजी घ्यावी?



सायबर भामटे सक्रिय असून नागरिकांनी अनोळख्या व्यक्तींशी व्यवहार करताना सावध राहावे, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे. ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर किवा शासनाच्या सायबर गुन्ह्याच्या संकेतस्थळावर तक्रार करावी, असे आवाहन काशिमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी केले आहे.

# दोन पिस्तुलांसह एकाला अटक

## पेल्हार पोलिसांची कारवाई

**वसई :** देशी बनावटीची दोन पिस्तुले आणि काडतुसे बाळगणाऱ्या एका आरोपीला पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वसई फाटा येथे एक व्यक्ती विना परवाना देशी बनावटीचे पिस्तुल आणि जिवंत काडतुसे घेऊन येणार असल्याची माहिती पेल्हार पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पेल्हार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने सापळा रचून आरोपीला अटक केली आहे. अभिषेक अनिल यादव असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून दोन पिस्तुल, दोन काडतुसे असा एकूण ४५ हजार ९०० मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पेल्हार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस जितेंद्र वनकोटी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोलीस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र. 4

# कार्डिनल रुग्णालयाची चौकशी

## रुग्णांच्या फसवणुकीचा आरोप; समितीचा अहवाल लवकरच

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसईच्या बंगली येथील कार्डिनल ग्रेशिअस मेमोरिअल रुग्णालयात रुग्णांची फसवणूक करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाकडून पाच सदस्यांची समिती नेमण्यात आली आहे. या चौकशीनंतर त्याचा अहवाल सादर करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

वसईच्या बंगली येथे कार्डिनल ग्रेशिअस मेमोरियल ट्रस्टचे रुग्णालय आहे. या रुग्णालयात वसईत राहणारे गिरीश पाठक यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. डॉ. राजीव शर्मा यांनी तपासाअंती त्यांना तीन ब्लॉकेज असल्याने अँजिओप्लास्टी करावी लागणार आहे. यासाठी सुमारे तीन लाख रुपये इतका खर्च येणार असल्याचे सांगण्यात आले होते. गिरीश यांची अँजिओप्लास्टी करून दोन ब्लॉकेज काढले व एक ब्लॉकेज औषधांनी निघून जाईल असे डॉक्टरांनी सांगितले होते. मात्र दोन दिवसांनी तपासणी केल्यानंतर औषधाने ब्लॉकेज गेला नाही. यासाठी पुन्हा अँजिओप्लास्टी करावी लागेल, असे डॉक्टरांनी त्यांना सांगितले होते. यासाठी पुन्हा अतिरिक्त खर्च येणार असल्याचे सांगण्यात आले. एकाच उपचारासाठी सातत्याने रुग्णालयाकडून पैसे उकळलेले जात असून एक प्रकारे ही रुग्णांची फसवणूक होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणावरून मनसेही आक्रमक झाली आहे. मनसेचे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी थेट रुग्णालयाला भेट दिली. तीन दिवसांत दोन वेळा अँजिओप्लास्टी करून सहा लाखांचे बिल का घेतले? हे उपचार एकाच वेळी न केल्यामुळे याचा फटका रुग्णाला बसला आहे. एकप्रकारे रुग्णालयाकडून रुग्णांची फसवणूक केली जात आहे, असा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी यासाठी पालघर जिल्हा आरोग्य विभागाकडे जाधव यांनी पत्राद्वारे मागणी केली होती. त्यानुसार जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य विभागाने पाच सदस्यांची समिती नेमली आहे. रुग्णालयाची चौकशी करून तसा अहवाल ही सादर करण्यात यावा, अशा सूचना जिल्हा आरोग्य विभागाकडून करण्यात आल्या आहेत.



### रुग्णालयाचे स्पष्टीकरण

रुग्णांवर करण्यात येत असलेल्या उपचाराबाबत, त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या संदर्भात पूर्ण कल्पना त्यांच्या नातेवाईक यांना देण्यात आली होती. रुग्णांची दोन वेळा अँजिओप्लास्टी करुन पहिल्या वेळेस एक व दुसऱ्या वेळेस १ असे दोन स्टेंट टाकले आहेत. यामुळे रुग्ण बरासुद्धा झाला आहे. रुग्णाची कोणत्याही प्रकारची फसवणूक व लूट करण्यात आली नसल्याचे स्पष्टीकरण रुग्णालयाचे विश्वस्त रोहन घोन्सालवीस यांनी सांगितले आहे. जी काही चौकशी लावण्यात आलेली आहे त्याला सामोरे जाण्यास आम्ही तयार आहोत, असेही घोन्सालवीस यांनी सांगितले. या रुग्णालयाला कोणत्याही प्रकारची शासकीय मदत मिळत नाही त्यामुळे सर्व जो काही इतर खर्च असतो तो रुग्णालयाला करावा लागतो.

### समितीची रचना

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रामदास तडस यांनी पाच जणांची समिती तयार केली आहे. या समितीचे अध्यक्ष प्रभारी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सचिन वाघमारे तर सदस्य म्हणून डॉ. नाथा दुटे, डॉ. दिनेश गिरी, स्नेहल गिंभल, अॅड. सीमा साठे यांचा समावेश आहे.

सकाळ पु. पान क्र. 1

# पाण्याच्या भटकंतीविरोधात हंडा मोर्चा

## पालघरमधील २० ग्रामपंचायत कार्यालयांसमोर महिलांची निदर्शने


विरार, ता. २ (बातमीदार) : पालघर जिल्ह्यात पाणीप्रश्नावर श्रमजीवी संघटनेने रान पेटवले आहे. पालघर जिल्ह्यात तब्बल २० ग्रामपंचायती, तर ठाणे जिल्ह्यात २१ ग्रामपंचायतींवर सोमवारी (ता. १) धडक मोर्चे काढून अधिकारी आणि कंत्राटदारांना चांगलाच दणका देण्याचे काम केले. विविध ग्रामपंचायत कार्यालयांवर काढलेल्या मोर्चात रिकामे हंडे घेऊन सहभागी झालेल्या महिलांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत, आमच्या घरात नळाचे स्वच्छ आणि मुबलक पाणी कधी येणार, याबाबत 'लेखी उत्तरे घेतली. वसई तालुक्यातील १४ ग्रामपंचायत कार्यालयांवर मोर्चे काढण्यात आले होते.

जलजीवन मिशन योजनेसाठी केंद्र आणि राज्य सरकारने कोट्यवधी रुपयांची तरतूद केली आहे. प्रत्येक गावात दोन कोटींपासून १० कोटींपर्यंतचा निधी आलेला आहे, मात्र या योजना आजपर्यंत पूर्णत्वास नाहीत. मूळ कंत्राटदार फक्त कागदावर असून प्रत्यक्षात भलतेच कंत्राटदार हे काम करत असून ते निकृष्ट दर्जाचे आहे. सोमवारपासून १० एप्रिलपर्यंत प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढून संघटनेने पाण्याच्या प्रश्नावर एक चळवळ सुरू केली आहे.

> प्रशासनाच्या इच्छाशक्तिच्या अभावामुळे जलजीवन मिशन योजनेचा कालावधी संपूनही अपूर्ण राहते, ही चीड आणणारी बाब आहे. म्हणूनच श्रमजीवी संघटनेने लढा उभारला आहे. ही योजना जोपर्यंत पूर्ण होत नाही, तोपर्यंत श्रमजीवी संघटनेचा प्रत्येक कार्यकर्ता, सभासद शांत बसणार नाही.
> - स्नेहा दुबे-पंडित, कार्याध्यक्ष, श्रमजीवी संघटना

### वसईमधील ग्रामपंचायतींवर मोर्चे

मेढे, आडणे भिनार, भाताणे, सकवार, खानिवडे, उसगाव, तिल्हेर, देपिवली, कंरजोण, पोमण, नागले अर्नाळा, सत्पाळा, शिरवली



विरार : श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून वसईतील ग्रामपंचायत कार्यालयांवर महिलांनी हंडा मोर्चा काढला.

सकाळ पु. पान क्र. ३

### मीरा बोरवणकर यांचे निर्भय महिला मेळाव्यात आवाहन

# अत्याचार घडताना बघ्याची भूमिका नको!

विरार, ता. २ (बातमीदार) : महिलांवर अत्याचार होत असताना समाजाने बघ्याची भूमिका घेऊ नये. महिलांना रोड मॉडेल समजू नका. मुलींनी सायबर क्राईमपासून सावध राहावे, असे आवाहन निवृत्त पोलिस महासंचालक मिरा बोरवणकर यांनी नंदाखाल येथे निर्भय महिला मंच आयोजित महिला मेळाव्यात केले. या वेळी निर्भय आंदोलन महिला विशेषांकाचे प्रकाशन बोरवणकर यांच्या हस्ते करण्यात आले.



विरार : निर्भय महिला मेळाव्यात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्त्रियांवरील अत्याचार कुटुंबातही होतात; पण पीडित महिला त्यावर बोलत नाही. महिलांवरील गुन्हे रोखण्यासाठी महिला पोलिसांची संख्या वाढली पाहिजे. ३३ टक्के आरक्षण असताना आता कुठे १२ टक्के महिला पोलिस दलात दाखल होत आहेत. बिहारमध्ये तर २० टक्के महिला पोलिस दलात आहेत. न्यायालयात खटले वेळेवर चालत नाहीत आणि तोपर्यंत साक्षीदार ठाम राहत नाहीत. त्यामुळे गुन्हेगार मोकाट राहतात. २०१९ च्या खटले आता लागले आहेत, अशी खंत बोरवणकर यांनी व्यक्त केली.

मुलींना सायबर क्राईमपासून सावध करणे, मोठ्या प्रमाणात महिला पोलिसांची भरती करणे, स्वयंसेवी संघटनांनी पोलिसांना बोलावून गुन्ह्याबाबत संवाद करणे, गुन्हे दाखल करण्यासाठी पुढे येणे, रात्री रस्त्यावरील दिवे सुरू ठेवणे, पालकांनी गुन्हे लपवून ठेवू नयेत. गुन्हेगार पळून जाऊ नये म्हणून तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगाराची आणि गुन्ह्याची माहिती नेटवरून लगेच प्रसिद्ध करणे अशा अनेक महत्त्वाच्या सूचना त्यांनी उपस्थितांना केल्या. या वेळी बोरवणकर यांनी लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली. बिल्किस बानो प्रकरण आणि मणिपूर अत्याचार घटना देशाला शरम आणणारी आहे, असे या घटनेचा निषेध करताना त्या म्हणाल्या.

यावेळी निर्भय महिला मंचच्या उपाध्यक्षा वैरोणिका डावरे यांना कृषी पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. शैला गोन्सालविस यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

याप्रसंगी निर्भय जन संस्थेच्या महिला विभाग अध्यक्षा लता लोपीस, लिनेट परेरा, रेजीना आल्मेडा, रेखा तुस्कानो उपस्थित होते. या कार्यक्रमास मच्छीमार समाजाच्या महिलांची मोठी उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती.

## निर्भयचा अनुभव कौतुकास्पद

नीतीमानांना गुन्हेगार घाबरतात. निर्भयने खऱ्या अर्थाने महिलांना निर्भय बनवले. आज संस्कृती, धर्म, राजकारण आणि समाजकारण यात स्त्रियांना समान वागणूक मिळत नाही. कायद्याचा धाक उरला नाही. संविधान पुसण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणूनच निर्भयचा अनुभव कौतुकास्पद आहे. ३३ वर्षांत निर्भयने समाज उभा करण्यासाठी प्रचंड कार्य केले. सर्वच क्षेत्रात व स्तरावर निर्भय जन मंचने उल्लेखनीय काम केले आहे, असे मत फा. ज्यो आल्मेडा यांनी व्यक्त केले.

पुण्यनगरी पान क्र.३

# पोलीस शिपायांच्या 'घरगडी' म्हणून वापराविरोधात याचिका

## मुंबईत २९४ पोलीस देताहेत 'घरगुती' सेवा ▮ राज्य सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश

▮ **मुंबई** : स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या घरी पोलीस शिपायांना घरगड्यांची कामे करावी लागत आहेत. याकडे लक्ष वेधणाऱ्या जनहित याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने राज्य सरकारसह सर्व प्रतिवाद्यांना नोटीस बजावून भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

मुंबई शहरात १२७ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या घरी २९४ पोलीस शिपाई कर्मचारी घरगुती आणि सेवक म्हणून नियुक्त केले जातात. या पोलीस शिपायांना हे अधिकारी घरगडी म्हणून वापर करून घेतात. याकडे लक्ष वेधत निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त राजेंद्र कुमार त्रिवेदी यांच्या वतीने ज्येष्ठ वकील ॲड. सतीश तळेकर, ॲड. माधवी अय्यपन यांच्या मार्फत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

या याचिकेची मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या वेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. सतिश तळेकर यांनी पोलीस नियमावलीतील नियम ४३१ मध्ये वरिष्ठ आयपीएस पोलीस अधिकाऱ्यांच्या कार्यालयालयात तसेच घरी क्षुल्लक काम करण्यासाठी पोलीस शिपाईची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. या शिपायांकडून घरगड्याची कामे करून घेतली जातात. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे ही जुलमी प्रथा आजही जपली जात आहे. यामुळे राज्य घटनेच्या अनुच्छेद २१ अन्वये सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचा दावा केला. तसेच शासकीय वसाहतीतील वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर मुंबईतील घर सोडत नसल्याच्या तक्रारी आल्यानंतर सरकारने मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक व इतर शहरांत बेकायदा वास्तव्य करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांकडून दंडात्मक भाडे वसूल करण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यानंतरही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घर सोडलेले नाही. हे अधिकारी आपल्या अधिकाराचा वापर करून दंड न भरताच बेकायदेशीर रहात आहेत. त्यांना तातडीने वसाहतीतील मुक्काम सोडण्यासाठी आणि त्यांच्याकडून दंडात्मक भाडे वसूल करण्यासाठी आदेश द्या, अशी विनंती ॲड.तळेकर यांनी केली. या वेळी राज्य सरकारच्या वतीने ॲड. जनरल बीरेंद्र सराफ यांनी भूमिका स्पष्ट करण्यासाठी न्यायालयाकडे वेळ मागितला. याची दखल घेत खंडपीठाने राज्य सरकारसह राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुंबईच्या पोलीस आयुक्तांना तीन आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश देत याचिकेची सुनावणी तहकूब ठेवली.

▮ मुंबई पोलीस दलात हवालदारांच्या २४,७६६ मंजूर पदांपैकी ९१३२ पदे आजही रिक्त आहेत. असे असताना २९४ पोलीस शिपायांना या वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर सुरक्षा रक्षक म्हणून नियुक्त करून पोलीस शिपायांवर अतिरिक्त भार टाकला जात आहे.

▮ वरिष्ठ आयपीएस पोलीस अधिकारी आपल्या घर-कार्यालयाच्या ठिकाणी नियुक्त करण्यात आलेल्या कनिष्ठ पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशासकीय, कारकुनीबरोबरच घरातील क्षुल्लक कामे करण्यासाठी घरगडी म्हणून राबवत आहेत.

▮ मुंबई पोलीस आयुक्तांच्या आस्थापनेवर काम करणारे सुमारे ५७ अधिकारी तसेच मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या व्यतिरिक्त इतर आस्थापनांवर कार्यरत ७० पोलीस अधिकारी असे सुमारे १२७ अधिकाऱ्यांच्या सेवेसाठी २९४ पोलीस शिपायांना नियुक्त करण्यात आले आहे. त्यांना बंगला सुरक्षा सहाय्यक म्हणून त्यांची ड्युटी लावली जाते, हे बेकायदेशीर आहे.

CS CamScanner



राष्ट्रीय हिन्दी दैनिक

# तरुणमित्र

www.tarunmitra.in

ठाणे- मुंबई से प्रकाशित

श्रम ही आधार, खबरों से सरोकार

वर्ष - 17 ♦ अंक 105 ♦ बुधवार, 03 अप्रैल 2024 ♦ मूल्य : 2 ♦ पृष्ठ 8 महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार से प्रकाशित e-mail-tarun.thana@gmail.com




# एमडी ड्रग्स की खेप के साथ एक नाईजीरियन गिरफ्तार, अपराध दर्ज

## पूर्व में भी तुलिंज पुलिस ने कई नाईजीरियन के पास से लाखों रुपये की एमडी ड्रग्स किया है जब्त

**वसई।** पिछले कई माह से तुलिंज पुलिस द्वारा नालासोपारा पूर्व क्षेत्र में नाईजीरियन के पास से लाखों रुपये एम.डी. ड्रग्स की खेप जब्त कर उनके खिलाफ केस दर्ज कर रही है। इसी कड़ी में फिर तुलिंज पुलिस ने एक 45 वर्षीय नाईजीरियन को 3 लाख से अधिक रुपये का एम.डी. ड्रग्स जब्त की है तथा उसके ऊपर तुलिंज थाने में एनडीपीएस एक्ट के तहत अपराध पंजीकरण कर आगे की विवेचना में जुट गयी है। मिली जानकारी के अनुसार, तुलिंज पुलिस को गुप्त सूचना मिली कि एक 45 वर्षीय नाईजीरियन शख्स एम.डी.ड्रग्स (मेफेड्रॉन) लेकर नालासोपारा पूर्व के तुलिंज ब्रिज के नीचे बेचने आने वाला है। सूचना के आधार के पर तुलिंज पुलिस ने 31 मार्च को रात्रि लगभग 9 बजे के आसपास जाल बिछाया और उपरोक्त नाईजीरियन शख्स को धर दबोचा लिया। पुलिस के अनुसार,नाईजीरियन शख्स की तलाशी ली गयी तो उसके पास से 35.160 ग्राम वजन एम.डी. ड्रग्स (मेफेड्रॉन) पाया गया है, जिसे बरामद कर लिया गया है। पुलिस ने कहा कि,ड्रग्स की कुल कीमत 3,51,600 रुपये आकी गयी है। और आरोपी नाईजीरियन (चुक्स अजाह) को गिरफ्तार किया गया है। यह मिरारोड पूर्व का रहने वाला है, मूल निवासी-स्टेट इनुगु, ईनाइजेरिया का है। तुलिंज थाने के वरिष्ठ पुलिस निरीक्षक शैलेन्द्र नगरकर ने बताया कि, उपरोक्त कार्रवाई मुखबिर की सूचना पर की गयीं है। उन्होंने कहा कि, उक्त नाईजीरियन शख्स उपरोक्त ड्रग्स नालासोपारा में बेचने आया था। हालाँकि, उसे गिरफ्तार कर तुलिंज थाने में एनडीपीएस एक्ट के तहत अपराध दर्ज किया गया है। उन्होंने कहा कि, यह कार्रवाई लगातार जारी रहेगी।

CamScanner

दैनिक
# आमची मुंबई

ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.

वर्ष : १३ | अंक. ०२ | बुधवार ०३ एप्रिल २०२४ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०४


# तुळींज पोलिसांनी पुन्हा नायजेरियनला लाखोंच्या अमली पदार्थासह पकडले

**वसई.** गेल्या अनेक महिन्यांपासून तुळींज पोलीस नालासोपारा पूर्व भागातील एका नायजेरियन



व्यक्तीकडून लाखो रुपयांच्या एमडी ड्रग्जची खेप जप्त करून त्याच्यावर गुन्हा दाखल करत आहेत. या मालिकेत तुळींज पोलिसांनी ४५ वर्षीय नायजेरियन व्यक्तीकडून पुन्हा ३ लाखांहून अधिक किमतीचे एमडी ड्रग्ज जप्त केले असून, त्याच्याविरुद्ध तुळींज पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तुळींज पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, ४५ वर्षीय नायजेरियन व्यक्ती एम.डी. नालासोपारा पूर्वेकडील तुळींज पुलाखालून ड्रग्ज (मेफेड्रोन) विक्रीसाठी जात असल्याच्या माहितीच्या आधारे तुळींज पोलिसांनी ३१ मार्च रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास सापळा रचून वरील नायजेरियन व्यक्तीला अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नायजेरियन व्यक्तीची झडती घेतली असता त्याच्याकडून ३५.१६० ग्रॅम वजनाचा एमडी जप्त करण्यात आला. औषधे (मेफेड्रोन) आढळून आली आहेत, ती जप्त करण्यात आली आहेत. अंमली पदार्थांची एकूण किंमत ३.५१.६०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आणि आरोपी नायजेरियन (चक्स अजाह) याला अटक करण्यात आली आहे. तो मिरारोड पूर्व येथील रहिवासी आहे, मूळचा एनुगु राज्य, नायजेरियाचा आहे.

तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर म्हणाले की, माहिती देणाऱ्याच्या माहितीवरून वरील कारवाई करण्यात आली आहे. सदर नायजेरियन व्यक्ती हा वरील अमली पदार्थ विकण्यासाठी नालासोपारा येथे आला होता, मात्र त्याला अटक करण्यात आली असून तुळींज पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सातत्याने सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

CamScanner